# मिरा भाईंदर महानगरपालिका

# माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रेसनोट

## मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 04 मधील अनधिकृत बांधकामावर महापालिकेची तोडक कारवाई

दिनांक 24 डिसेंबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 04 कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर महानगरपालिकामार्फत तोडक कारवाई करण्यात आली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असून गेल्या काही आठवड्यापासून अशी अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त केली जात आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार उपायुक्त (अतिक्रमण विभाग) कल्पिता पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी झालेल्या बैठकीत उपायुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या पार्श्वभूमीवर दिनांक 24 डिसेंबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 04 अंतर्गत नेमिनाथ हाइट्स जवळ बांबू ताडपत्रीच्या सहाय्याने बनवण्यात आलेल्या 96 अनधिकृत झोपड्या व 12 भंगार गोडाऊनवर अतिक्रमण विभागामार्फत जेसीबीच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण, प्रभाग समिती क्रमांक 04 सहाय्यक आयुक्त सुधाकर लेंडवे, कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण विभाग कर्मचारी, फेरीवाला पथक व महाराष्ट्र सुरक्षा बलचे जवान उपस्थित होते.